CB

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## (B. J. PRINT MEDIA)

**वृत्तपत्रविद्या पदवी (मुद्रित माध्यम)**
**परीक्षा :- डिसेंबर- २०२४**
**सत्र - १**
**विषय : भाषा (Language) (BJ-22-12)**

| दिनांक: १८/१२/२०२४ | गुण : ६० | वेळ : स. १०.०० ते १२.३० |
|---|---|---|

**सुचनाः १. प्रश्न क्र. ५ आवश्यक   २. इतर कोणतेही ३ प्रश्न सोडवा**

**प्र. १.** निबंध म्हणजे काय? निबंधाचे विविध प्रकार स्पष्ट करा. (१५)

**प्र. २.** निबंध लेखनाची पूर्व तयारी कशी करावी लागते ते स्पष्ट करा. (१५)

**प्र. ३.** जाहिरात म्हणजे काय? जाहिरातीचे प्रकार सांगा. (१५)

**प्र. ४.** सारांश लेखन म्हणजे काय? सारांश लेखनाच्या पायऱ्या सांगा. (१५)

प्र. ५. **खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पाचशे शब्दात निबंध लिहा.** (१५)

१) लोकशाहीत निवडणुकांचे महत्त्व

२) माध्यमांचे महत्त्व

३) माझा आवडता नेता

प्र. ६. **सोबत दिलेल्या उताऱ्याचा १/३ सारांश करा.** (१५)

## English Translation

**Instructions: 1) Question No. 5 is compulsory.**
**2) Attempt any 3 from remaining.**

**Q. 1.** What is an essay? Explain the different types of essay. **(15)**

**Q. 2.** Describe how to Prepare for writing an essay. **(15)**

**Q. 3.** What is advertisement? Explain the different types of advertisement. **(15)**

**Q. 4.** What is summary writing? Explain the steps of Summary writing. **(15)**

**Q. 5. Write an essay on any one of the following topic (500-600 Words)** **(15)**

1) Importance of elections in a democracy
2) Importance of Media
3) My Favorite Leader

**Q. 6. Summarize 1/3 of the Passage given with it.** **(15)**

मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने गुरुवारी घेतला. यामुळे सरकारी पातळीवर गेली ११ वर्षे आणि तात्त्विक पातळीवर अनेक दशके सुरू असलेल्या लढ्याला यश आले आहे. राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्राने घेतलेल्या या निर्णयामुळे एक भाषा म्हणून मराठीचा सर्वंकष विकास होण्याची सुवर्णसंधी खुली झाली आहे. या निर्णयाचे राज्यभरातून स्वागत करण्यात आले. मराठीसह पाली, प्राकृत, आसामी व बंगाली या भाषांनाही अभिजात दर्जा देण्याच्या प्रस्तावावर केंद्रीय मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. बिहार, आसाम, पश्चिम बंगालमधून अनुक्रमे पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठीही केंद्राकडे प्रस्ताव आले होते. त्यानुसार भाषाविज्ञान तज्ज्ञ समितीने साहित्य अकादमी अंतर्गत यंदा २५ जुलै रोजी झालेल्या बैठकीत सुधारित निकष जाहीर केले. या समितीने मराठीसह पाच भाषांना अभिजात भाषा मानण्याबाबत शिफारस केली. त्यानंतर हा प्रस्ताव गृह मंत्रालयाच्या माध्यमातून तपासून केंद्रीय मंत्रिमंडळासमोर सादर झाला व गुरुवारी त्यावर शिक्कामोर्तब झाले, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. आगामी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानी दिल्लीत होणार आहे व त्या पार्श्वभूमीवर मराठीला अभिजात दर्जा मिळण्याचे स्वप्न साकार होणे, हा सुमारे १२ कोटी मराठी बांधवांसाठी अत्यानंदाचा क्षण साकारल्याची भावना व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र सरकारने ११ वर्षांपूर्वी २०१३ मध्ये मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची विनंती करणारा अधिकृत प्रस्ताव केंद्राकडे पाठवला. राज्यात २०१४ मध्ये सत्ताबदल झाल्यावर यासाठीच्या प्रयत्नांना व घोषणांना गती आली. मराठीला अभिजात दर्जा देण्यासाठी २०१७ मध्ये मंत्रिमंडळाच्या मसुद्यावरील आंतर-मंत्रालयीन सल्लामसलत गटाने यासाठीच्या निकषांत बदल केले. यासाठी संसदेत कित्येक वेळा मराठीला अभिजात दर्जा देण्याची मागणी करण्यात आली. अनेक मराठी खासदारांनी ही मागणी संसदेच्या दोन्ही सभागृहांत लावून धरली. रंगनाथ पठारे समितीचा विस्तृत अहवाल साहित्य अकादमीकडे अनेक वर्षे आधीच पोहोचलेला आहे.

कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी साहित्य अकादमीने तयार केलेल्या पुढील निकषांत मराठी पूर्णपणे बसते, असे मत दिल्लीतील अकादमीच्या वर्तुळातही अनेकदा व्यक्त होत होते. मात्र प्रत्यक्ष घोषणा लांबत गेली.

सन २०१३ मध्ये केंद्रीय संस्कृती मंत्रालयाला राज्य सरकारचा पहिला प्रस्ताव मिळाल्यावर तो साहित्य अकादमी व सांस्कृतिक समितीकडे पाठवण्यात आला होता. या समितीने अभिजात भाषेसाठी मराठीची शिफारस केली त्यालाही आठ वर्षे उलटून गेली. या दरम्यान महाराष्ट्र सरकारने रंगनाथ पाठारे समितीसह अनेक अहवाल व पुरावे साहित्य अकादमीकडे जमा केले होते. अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे या सर्व मुख्यमंत्र्यांच्या काळात मराठी भाषेला लवकरच अभिजात भाषेचा दर्जा मिळेल; अशा घोषणा कधी विधानसभेत, तर कधी जाहीर कार्यक्रमात केल्या गेल्या होत्या. ज्येष्ठ भाजप नेते विनोद तावडे महाराष्ट्रात मराठी भाषा मंत्री असल्यापासून याबाबत दिल्लीत पाठपुरावा करीत होते.

कर्नाटकात मराठीत शिलालेख आढळलेला शिलालेख हा मराठीच्या प्राचीनत्वाचा सर्वांत पहिला पुरावा मानला जातो. मराठीतील 'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधू' यांसारख्या ग्रंथांचे पुरावे बाराव्या-तेराव्या शतकापासून आढळतात. त्याच्याही आधीचा 'अंगविज्ञा' हा तत्कालीन समाजजीवन व संस्कृतीचे दर्शन घडवणारा महाराष्ट्री प्राकृतातील ग्रंथ उपलब्ध असल्याचे अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. मराठी ही प्राचीन भाषा असून, ती संस्कृतपासून निर्माण झालेली भाषा नव्हे असे अनेकानेक विद्वानांनी स-प्रमाण दाखवून दिले आहे.

अभिजात दर्जामुळे मिळणारे काही ठळक फायदे -

- मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून राज्याला भरीव (वार्षिक किमान ९५० कोटी रुपये) अनुदान मिळेल.
- मराठीतील बोलींभाषांचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह अधिक सोपे होणार.
- भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय शक्य.
- प्राचीन ग्रंथांचा मराठीत अनुवाद.
- महाराष्ट्रातील सर्व, सुमारे १२००० ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी फायदा

On Thursday, the central government decided to give elite status to five languages including Marathi. This has resulted in the success of the struggle which has been going on for the past 11 years at the government level and several decades at the theoretical level. Due to this decision taken by the Center in the run-up to the state assembly elections, a golden opportunity has been opened for the all-round development of Marathi as a language. This decision was welcomed from all over the state. The Union Cabinet approved the proposal to give classical status to Pali, Prakrit, Assamese and Bengali languages along with Marathi. Accordingly, the Linguistics Expert Committee announced revised criteria in a meeting held on July 25 under Sahitya Akademi. This committee recommended to consider five languages including Marathi as classical languages. After this proposal was examined through the Home Ministry and submitted to the Union Cabinet and it was approved on Thursday, Union Minister Ashwini Vaishnav informed that the upcoming All India Marathi Literature Conference will be held in the capital Delhi and in the background of this, Marathi will get elite status.

The realization of a dream is a moment of rapture for about 12 crore Marathi brothers. The Maharashtra government sent an official proposal to the Center requesting the status of classical language to Marathi 11 years ago in 2013. After the change of power in the state in 2014, efforts and announcements for this accelerated. For this, many times in the Parliament, there was a demand to give Marathi an elite status. Many Marathi MPs raised this demand in both houses of Parliament. A detailed report of the Ranganath Pathare Committee has reached Sahitya Akademi several years ago. Literature to give any language a classic status

The opinion that Marathi fully fits the following criteria prepared by the academy was often expressed in the circles of the academy in Delhi as well. However

The actual announcement was delayed.

In 2013, when the Union Ministry of Culture received the first proposal from the state government, it was sent to the Sahitya Akademi and the Cultural Committee. Even eight years have passed since this committee recommended Marathi for the classical language, while the Maharashtra government had submitted many reports and evidences to the Sahitya Akademi along with the Ranganath Pathare Committee. During the chief ministers of Ashok Chavan, Prithviraj Chavan, Devendra Fadnavis, Uddhav Thackeray and Eknath Shinde, such promises were made sometimes in the assembly and sometimes in public programs that Marathi language would soon get the status of a classical language. Senior BJP leader Vinod Tawde was pursuing this in Delhi since he was the Marathi language minister in Maharashtra.

Inscriptions found in Marathi in Karnataka are considered to be the earliest proofs of the antiquity of Marathi. Evidence of Marathi texts like 'Leelacharitra', 'Dnaneshwari', 'Viveksindhu' are found from twelfth to thirteenth century. Many scholars have shown that there is a book in Maharashtrian Prakrit that shows the social life and culture of that time called 'Angavijra' before him. Many scholars have proved that Marathi is an ancient language and it is not a language derived from Sanskrit.

Some of the salient benefits of elite status are –

The state will get a substantial subsidy (at least Rs. 950 crores annually) from the central government for the overall development of Marathi.

Study, research, literature collection of Marathi dialects will be easier,

Marathi teaching facilities available in all 450 universities in India.

Translation of an ancient text into Marathi.

Benefit to empower around 12000 libraries all over Maharashtra